# रुमझुम



१९४०

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८५

REFBK-0011237
REFBK-0011237

# रुमझुम

## अभिनय गीतसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २०५५८ वि: काव्य
क्रमांक २४८५ नों: दि: २-१-६१

संपादिका
**सौ. मैत्रेयी विनोद**
लेडी सुपरिंटेंडेंट, गव्हर्मेंट ट्रेनिंग कॉलेज
फॉर वुइमेन, पुणें १

REFBK-0011237
REFBK-0011237
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
दा. क्र. 11236

१९६०

किंमत १ रुपया

: प्रकाशक :

स. आ. जगताप,
जगताप–कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणें २.

: मुद्रक :

मा. र. कारले,
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार, पुणें २.

# प्रस्तावना

जीवन-शिक्षण-पद्धतीनें चालणाऱ्या प्राथमिक शाळांमध्यें सांस्कृतिक कार्यक्रमांस फार महत्त्वाचें स्थान आहे. ह्या कार्यक्रमांतून बालविद्यार्थ्यांना निसर्गाचा आणि भोंवतालच्या सामाजिक परिस्थितीचा परिचय कृतींतून व मनोरंजक रीतीनें होत असतो. कार्यक्रम पार पाडतांना प्रसंगानुरूप रचलेल्या कवितांची वा गाण्यांची मोठी मदत होते; परंतु अशा कवितांमध्यें व गाण्यांमध्यें खरा काव्यगुण असणें अत्यंत आवश्यक आहे, हें विसरून चालणार नाहीं. निव्वळ यमक जुळवून व कोणत्या तरी वृत्ताच्या चौकटींत शब्द ठांसून बसवून काव्याची निर्मिति होत नाहीं. अशा प्रकारची शब्द-रचना हास्यास्पद ठरते आणि तिच्या योगानें कार्यक्रमास रंग न चढतां एक प्रकारची कृत्रिमता येते. प्रतिभा जागृत झालेली असली, मन हेलावलें गेलें तरच त्या रचनेंत मनाची पकड घेणारा काव्यगुण प्रकट होईल. काव्य वा गाणें हवें म्हणून तें रचण्याचा उपद्व्याप न करणेंच योग्य. हुकमी काव्यांत रस नसतो. त्यामुळें त्यांतून खरें रंजन साधत नाहीं व त्याला अजाणतां झालेल्या विडंबनाचें स्वरूप येतें. अशा काव्यापेक्षां सरळ साधें गद्यच उत्तम. त्यांतून सुस्पष्ट अशा वर्णनाचें प्रयोजन तरी साधतें.

प्रस्तुत संग्रहांतील बऱ्याच कवितांपाठीं प्रतिभा आहे. त्यांचें स्वरूप हुकुमी नाहीं. 'वनमहोत्सव' 'झांशीची राणी' 'महाराणी लक्ष्मीबाई' 'स्वातंत्र्यदिन' यांसारख्या प्रासंगिक कवितांमध्यें काव्यगुण प्रकर्षानें नसला तरी अंशतः तरी आहेच. प्रार्थनेचीं व स्तवनाचीं गीतें आहेत. त्यांतहि काव्य आहे. त्यामुळेंच विशिष्ट प्रसंगीं व थोर व्यक्तींची जयंति व पुण्यतिथि साजरी करतांना ह्या गीतांचा निश्चित उपयोग होईल. संग्रहांतील निसर्ग-गीतें सुंदर वठलीं आहेत. 'फुलांचें संमेलन' 'फुलांची कुजबूज' या

कवितांत बालमनाशीं एकरूप होऊन कवियत्री फुलांच्या राज्यांत रमल्या आहेत. त्यामुळें फुलांचा परिचय मोठ्या गमतीनें झाला आहे. 'माळीण' या संवादात्मक अभिनय-गीतांत काव्यास मानवणारा व बालमनास पटणारा खुसखुशीत विनोद ओतप्रोत भरला आहे. 'उ :काल', 'श्रावणमास', 'आमचे सण' या कवितांत आपल्या जीवनांतील नित्याचे पण आपल्या संस्कृतींत मुरलेले असे प्रसंग अत्यंत हळुवार हातानें रंगविले आहेत. ह्या कविता बालमनाला रमवितील आणि त्याबरोबरच आपल्या संस्कृतींतील गोडवा व्यक्त करून दाखवितील.

अध्यापन-विद्यालयांतलि व अध्यापन-शाळेंतील शिक्षिकांनीं रचलेल्या या गीतांचा हा संग्रह सर्वतोपरी स्तुतीस पात्र आहे. जीवन-शिक्षण-शाळें-तील शिक्षकांस ह्यांतलीं गीतें उपयुक्त आणि मोलाचीं वाटतील असा विश्वास वाटतो.

सुलभा पाणंदीकर,

माजी शिक्षणाधिकारी, मुंबई राज्य

# अभिप्राय

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या देशांत शिक्षणाचे बाबतींत जें परिवर्तन झालें त्याचे पडसाद आतां ठिकठिकाणीं उठत आहेत. शिक्षणानेंच सुसंस्कृतपणा निर्माण व्हावा, बालमनाचा सर्वांगीण विकास होऊन चालू पिढी ही राष्ट्राची आधारस्तंभ व्हावी हा विचार सर्वांना पटलेला आहे. आपल्या शाळा आतां जीवन-शिक्षण-मंदिरें झालीं आहेत. शिक्षणांत केवळ लेखन-वाचन व अंकज्ञान यांस महत्त्व राहिलें नसून सांस्कृतिक विकासासाठीं आणि सामुदायिक जीवनासाठीं आपल्या शाळांच्या प्रचलित अभ्यासक्रमांत सरकारनें इष्ट असे बदल घडवून आणले आहेत. सांस्कृतिक विकासाचें कार्य हें दररोजच्या जीवनाशीं निगडित असें आहे. सण-समारंभ व उत्सव यांतूनच मुलांना नागरिकाचें उत्तम शिक्षण मिळतें. आपली जुनी परंपरा, पूर्वजांची कर्तबगारी, संत-महात्म्यांची शिकवण, ईश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि इत्यादि गोष्टींचा वारसा बालकांना योग्य वेळीं मिळाल्यास त्यांच्या विकासासाठीं लागणारी इष्ट अशी पार्श्वभूमि त्यांतूनच निर्माण होणार आहे. या दृष्टीनें प्राथमिक शाळा आणि अध्यापक विद्यालयें येथें जें शिक्षण दिलें जातें तेथें सांस्कृतिक विकासाचें वातावरण सतत लाभल्यास मुलांमुलींना अत्यंत पोषक ठरणार आहे.

पुणें येथील सरकारी बेसिक ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन या संस्थेनें योजलेला हा उपक्रम अतिशय स्वागतार्ह वाटतो. प्रस्तुत गीत-संग्रह वरील विवेचनास पोषक असा आहे. गीतांची रचना, निवड, चाली आणि आशय हा त्या त्या प्रसंगांना योग्य असा आहे. वर्षभर शाळेच्या कार्यक्रमामध्यें अशा गीतांच्या द्वारें योग्य असे संस्कार घडविण्यास निश्चित मदत होईल, असा भरवंसा वाटतो. बहुतेक गीतें संवादात्मक व अभिनय-

युक्त अशीं असल्यामुळें मुलांमुलींच्या सहज प्रवृत्तींस अनुकूल व पोषक आहेत. बाल-बालिकांना त्यांत खूप गंमत वाटेल. त्यांतून त्यांचें रंजन होऊन त्यांच्या भावनांना योग्य असें वळण मिळेल, अशी खात्री वाटते.

हा उपक्रम ज्यांनीं योजला व ज्यांनीं ज्यांनी या संग्रहासाठीं रचना करून साहाय्य केलें त्या सर्वांचें अभिनंदन करणें आवश्यक वाटतें. प्राथमिक शाळा, अध्यापन-विद्यालयें आणि माध्यमिक शाळा या सर्वांना हा संग्रह शैक्षणिक दृष्टीनें फार मोलाचा वाटेल, असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं. सर्वांनीं या उपक्रमाचें स्वागत करावें अशी मी शिफारस करतों.

दिनांक २७ जुलै १९५९

पां. ब. पानसे,
ॲड. ऑफिसर जिल्हा स्कूलबोर्ड, पुणें

# 'हृद्गत'

जीवन-शिक्षणाचें एक प्रमुख अंग म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रम. आपली संस्कृति टिकविण्याचें, त्याचप्रमाणें इतिहासाच्या स्मृति जागृत ठेवण्याचें काम हे कार्यक्रम करीत असतात. आपल्या पूर्वजांपासून स्फूर्ति मिळण्याचे हे अखंड वाहाणारे झरे आहेत आणि ते सतत जिवंत आणि जोमदार ठेवण्यासाठीं अभिनय, नाट्य, नृत्य, संगीत इत्यादि ललित कलांची त्यांना जोड मिळणें अत्यंत जरूर असतें.

आमच्या प्रॅक्टिसिंग स्कूलच्या शिक्षिका निरनिराळ्या उत्सवप्रसंगीं व संमेलनप्रसंगीं स्वतः संवाद, गाणीं रचून तीं मुलींकडून बसवून घेत असतात. त्यांनीं प्रसंगविशेषीं रचलेलीं अशीं बरींच गाणीं, मूकदृश्यें व संगीतिका उपलब्ध आहेत. ज्या ज्या वेळीं त्यांचे प्रयोग शाळेंत व ट्रेनिंग कॉलेजांत झाले त्या त्या वेळीं त्यांचे हे नवशिके प्रयत्न प्रकाशित करण्याइतके चांगले आहेत असें मला वाटे. काव्य, नेपथ्य व अभिनय यांनीं नटलेल्या अशा कृतींचा संग्रह एका दृष्टीनें खरोखरच अभिनव ठरेल व रसिकांस हृद्य वाटेल असा मला भरंवसा होता. प्राथमिक शाळेंतल्या शिक्षकवर्गास ह्या संग्रहांतील कृति उपयुक्त वाटतील असा विश्वास वाटतो. यांतलीं कांहीं संघगीतें मूलोद्योगीय प्रदर्शनांत पहिल्या नंबरच्या बक्षिसास पात्र झालेलीं असून त्यांचें नभोवाणीवरहि स्वागत झालेलें आहे व तीं अद्याप मुलांच्या तोंडीं आहेत.

मागें एकदां कु. एम्. जे. वाडिया रि. ले. सु. ट्रे. कॉ. फॉ. वुइमेन पुणें, ह्यांनीं अभिनयगीतें छापून कन्याशिक्षक मासिकातर्फें प्रकाशित केलीं होतीं व त्यांचा खपहि खूप झाला होता. जर अशाच तऱ्हेनें हा संग्रह

प्रसिद्ध झाला तर सांस्कृतिक कार्यक्रम करण्याला ज्या कलाकृतींची वाण पडते ती दूर होईल असें वाटतें. खपिह चांगला होईल अशी माझी प्रामाणिक समजूत आहे; पण हें पुरें होण्याचें फार लांबणीवर पडूं लागलें. कारण धंदेवाईक प्रकाशक धंद्याच्या दृष्टीनें ह्या संग्रहाला कांहींच किंमत देत नव्हते. पदरमोड करून खर्च करणें आम्हांला अशक्य होतें. मागच्या-सारखें 'कन्याशिक्षक' हाताशीं नव्हतें. त्यामुळें छापण्यास योग्य हस्तालिखित तयार करूनहि जवळजवळ २ वर्षें हा संग्रह प्रसिद्ध करणें अशक्य झालें. परंतु आज हें काम श्री. जगताप-कारले प्रकाशनाचे चालक धाडस म्हणून अंगावर घेत आहेत ही त्यांना अभिनंदनीय गोष्ट आहे.

कु. सुलभा पाणंदीकर ह्यांच्यासारख्या प्रथितयश लेखिकेचा व शिक्षणतज्ज्ञांचा त्याला पाठिंबा व आशीर्वाद आहे. त्यांच्या आशीर्वादानें हा छोटा संग्रह उपयुक्त व लोकप्रिय होईल अशी आशा आहे.

'मनीषा' २–४–६०

सौ. शांता काळे,
रि. डे. ए. इ. पुणें.

—०—

# संपादकीय निवेदन

दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम शाळेंतून साजरे होतात. विषय तेच असले तरी प्रसंग दरवर्षी वेगवेगळे निवडावे लागतात. अशी रचना तयार मिळतेच असें नाहीं. अशा वेळीं आमच्या शिक्षिकांनीं स्वतःच प्रसंग निवडून अभिनय-गीतें व स्तवन-पद्यें तयार करून कार्यक्रम पार पाडले. हे कार्यक्रम प्रेक्षक व श्रोत्यांच्या आवडीस पात्र ठरल्यामुळें दुसऱ्या शिक्षकांसहि यांचा उपयोग होऊन देवाण-घेवाण वाढावी या अपेक्षेनें या संग्रहाच्या प्रकाशनाची कल्पना आमच्या मनांत आली.

अनेक शिक्षिकांच्या या रचना असल्यामुळें ही कल्पना त्यांच्याशीं बोलून दाखविली गेली. संग्रह प्रसिद्ध करावा व त्यांतून जो कांहीं फायदा मिळेल, तो आपल्या शाळेंतील गरीब पण होतकरू विद्यार्थिनींसाठीं उपयोगांत आणावा अशी सर्वांची इच्छा दिसली.

कल्पना व इच्छा कितीहि सोज्ज्वल असल्या तरी आर्थिक गरज ही त्यांना मोडता घालते. सरकारी संस्था त्यामुळें बंधनें फार. एखाद्या प्रकाशकाला गांठून सर्व कांहीं त्याच्यावर सोंपवावें व मिळेल ती रक्कम शाळेंत गरीब विद्यार्थिनींसाठीं फंड सुरू करून त्या फंडाला द्यावी या दृष्टीनें बरेच प्रयत्न झाले; पण काव्यसंग्रहाचा खप होत नाहीं अशीं मतें व्यक्त करून प्रकाशकांनीं आमची दाद घेतली नाहीं व त्यामुळें वर्ष गेलें.

आमची कल्पना जगताप-कारले-प्रकाशनाच्या चालकांनीं मूर्त स्वरूपांत आणण्याचें काम हातीं घेतलें याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके कमीच आहेत. त्याचप्रमाणें आपला बहुमोल वेळ खर्च करून मा. कु. पाणंदीकर-बाई यांनीं सर्व गीतें वाचून गुणदोषविवरण चांगलें केलें. मा. श्री. पानसे यांनीं आपला अभिप्राय दिला. मा. सौ. काळे यांनीं आपलें

हृद्गत व्यक्त केलें. या सर्वांच्या आस्थापूर्वक सहकार्यांबद्दल धन्यवाद. शेवटीं सर्व कवियित्री शिक्षिकांनीं गीतें लिहून संग्रहाचा आर्थिक फायदा शाळेकरितां देण्याचा उदारपणा दाखविला याबद्दल त्यांचें मी मनापासून अभिनंदन व कौतुक करतें.

सौ. मैत्रेयी विनोद,
लेडी सुपरिंटेंडेंट,
गव्हर्नमेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | उषःकाल | सौ. शांताबाई काळे |
| २ | वसंतऋतु | अंबू आगटे |
| ३ | फुलांचें संमेलन | कृष्णाबाई सावकार |
| ४ | श्रावणमास | सत्यवतीबाई राणे |
| ५ | संदेश | अंबू आगटे |
| ६ | आमचे सण | अंबू आगटे |
| ७ | गांवगाडा | सौ. पार्वतीबाई ठोंबरे |
| ८ | निशिनाथाच्या राज्यांत | इंदुमति छल्लारे |
| ९ | झांशीची राणी | सत्यवतीबाई राणे |
| १० | पृथ्वीचा नवसाज | अंबू आगटे |
| ११ | फुलांची कुजबूज | सौ. सुनिता गांगल |
| १२ | वनमहोत्सव | अंबू आगटे, सौ. पार्वतीबाई ठोंबरे |
| १३ | पाऊस आला | कु. दुर्गा गोखले |
| १४ | लक्ष्मणा, थांब | सौ. सुमन जेजुरीकर |
| १५ | कमल-समर्पण | सौ. शांताबाई काळे |
| १६ | महाराणी लक्ष्मीबाई | अंबू आगटे, सौ. पार्वतीबाई ठोंबरे |
| १७ | कस्तुरबा केंद्र | कृष्णाबाई सावकार |
| १८ | कापूस | सौ. फुलवंता झोडगे |
| १९ | माळीण | सौ. फुलवंता झोडगे |
| २० | स्वातंत्र्यदिन | सत्यवतीबाई राणे |
| २१ | प्रार्थनापद्य | अंबू आगटे |
| २२ | शारदास्तवन | अंबू आगटे |
| २३ | नेहरूचाचा | कृष्णाबाई सावकार |
| २४ | रवींद्रांस वंदन | कृष्णाबाई सावकार |
| २५ | बालसुमनें | कृष्णाबाई सावकार |


—:०:—

अनुक्रम ............ नों: दि: ..........
क्रमांक ..........

# उषःकाल

( प्रभातकालचें मंगल-दर्शन या काव्यांत पाहावयास मिळेल. खालील काव्यांतील पात्रांना योग्य पोशाख देऊन अत्यंत शांत व अर्थपूर्ण कृति करावी. )

पहांट पातली । निशा संपली ।
हांसत नाचत । उषा उदेली ।
पूर्वा रंगली लाल । सुखकर झाला प्रातःकाल ॥ ध्रु० ॥

शुक्राची चांदणी । गगनांगणीं ।
स्वागत अर्पीते । उषेलागुनी ।
पूर्वा रंगली लाल । सुखकर० ॥ १ ॥

सासूरवासिनी । दळते कोणी ।
मायेचा आठव । झरे लोचनीं ।
देती कंकणताल । सुखकर० ॥ २ ॥

घालुनी अंगणीं । गोमय सडा ।
रेखीते रांगोळी । कोणी नवोढा ।
चित्तीं स्वप्न विशाल । सुखकर० ॥ ३ ॥

निघाल्या युवती । आणाया जल ।
प्राजक्त पसरी । म्हणूनी शाल ।
भ्रांती सुम पाऊल । सुखकर० ॥ ४ ॥

घेऊनी दुग्धाचे । भरले घट ।
डौलांत चालती । गौळणी वाट ।
बोले डोंगर माळ । सुखकर० ॥ ५ ॥

मांगल्य, पावित्र्य । यांची पाखर ।
निसर्ग घालीत । अशी भूवर ।
येतां सांज सकाळ । सुखकर० ॥ ६ ॥



—सौ. शान्ताबाई काळे.

# वसंतऋतु

( वसंतऋतूंत वातावरणांत कसाकसा बदल होतो; त्याचें वर्णन खालील कवितेंत वाचा. )

**कृति**—१२ अगर १६ मुली घ्याव्या. पानाफुलांचे अलंकार घालून अर्थपूर्ण कृति करावी.

( चाल-जारी जारी ।

वनदेवीस आनंद झाला ।
पहा कोकीळ सांगे जनाला ।
हा हासत वसंत आला ॥ ध्रु० ॥

लता वेलींची झाली तयारी ।
गोड पालवी श्रृंगार ल्याली ।
गोड साज झाला । देई वायु झोला ।
करूं मोदभरें स्वागताला ॥ १ ॥

पुष्पकळ्यांनीं बहार केली ।
हिरव्या शालूवरी रांगोळी ।
चमचम वेली करी । मोहोर आंब्यावरी ।
कणाकणांत सुगंध भरला ॥ २ ॥

छुम् छुम् वाजत पर्जन्य आला ।
सडा शिंपून सुखवी जनाला ।
दारीं तोरण चढे । फलभारें डुले ।
गाई कोकीळ पंचम सुराला ॥ ३ ॥

—अम्बू आगटे

# फुलांचें संमेलन

अध्यक्ष—जास्वंद.

संमेलन सेक्रेटरी–सदाफुली. श्रोते–मानव.

निमंत्रित मंडळी–गुलाब, मोगरा, पारिजातक, कमळ.

( १ ) सदाफुली अध्यक्षांची ओळख करून देते.

( २ ) अध्यक्ष–जास्वंदीचें प्रास्ताविक भाषण.

( ३ ) निमंत्रित मंडळींचा परिचय.

( ४ ) अध्यक्षीय भाषण.

( ५ ) भूमातेला फुलांचा हार अर्पण करणें.

अध्यक्षांची ओळख

सदाफुली—अध्यक्षांचा गोड भाव । जिथें तिथें यांचा गांव ।
देवापाशीं सदा ठाव । भक्त हा खरा ।
पांच पाकळ्यांची कृती । तशी गेंददार अती ।
अंगीं नम्रता धरी ती । सौजन्य अहा ।
रंग तांबडा पांढरा । औषधीही गूण बरा ।
मानवांना नाहीं प्यारा । परी ना खंत ।
नाहीं जरी वास गंध । नांव असे जासवंद ।
डोलणें हा गोड छंद । ध्यान देवाचें ।

अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण

जास्वंद—केला सुमांचा जमवोनी मान ।
देऊनी आम्हां अध्यक्ष-स्थान ।
झालों आम्हीं आज उपकार-बद्ध ।
केव्हां न जाऊं सुजना विरुद्ध ।

देतील सुमनें स्वपरीचयातें ।
जाणूनि घ्या हो हळुवार चित्तें ।
इच्छा असे कोमल हीच माझी ।
तुम्हांस होऊं कार्यांत राजी ।
[ सुमनें आपापला परिचय करून देतात.

**गुलाब**—मम नाम तुम्हां ठावें का ? ।
मज म्हणती गुलाबकलिका ।
नंदनवन भूमातेचें ।
जन्मस्थळ काश्मिर अमुचें ।
मम रंग गंध लोकांना ।
बहु प्यारा न्यारा कविंना ।
माझींच करिति अत्तरें ।
फुलांचे तुरे । जनहिता मरे ।
उपयुक्त असे मी लोकां ।
मज म्हणती गुलाबकलिका ।
मम नाम तुम्हां कळलें का ? ।
मज म्हणती गुलाबकलिका ।

**मोगरा**—रंग साजिरा । नांव मोगरा ।
वसंतांत बहर । अति तो रम्य गोजिरा ।
गंध दरवळे । टपोरे कळे ।
रोखुनीच बघति मला । कितिकांचे डोळे ।
वेणि गुंफिती । गुच्छ बनविती ।
गजराही मोगरिचा । युवति माळती ।
रंग पांढरा । प्रियहि शंकरा ।
पुष्पराज मीच खरा । चित्तिं हें धरा ।

**पारिजातक**—मी खूण असें प्रेमाची ।
भामेला स्मृति कृष्णाची । निशिदिनीं ।
मम गंध मोहितो लोकां ।
गुंगवितो कितीक रसिकां । क्षणभरी ।
उमलतें दारिं भामेच्या ।
सेवा अंगणि रुक्मिणिच्या । ख्यात हें ।
प्राजक्त, वदति हो भक्त, रंग आरक्त ।
धवल हो माझा । नाजूक फुलांचा राजा ।
या जनीं ।

**कमळ**—मज म्हणती हो कमलिनी ।
प्रभातीं हांसत ये उमलुनी ।
हिरवें हिरवें पाचूसम जल ।
त्यांत विहार करि निर्मळ ।
मम कांति किती सोज्वल ।
श्रीगजानना, प्रिय मी देवांना ।
अलंकार पूजनीं
प्रभातीं हांसत ये उमलुनी ।

**अध्यक्षांचें समारोपाचें भाषण**—

सुजन हो, आम्हां सुमनांचा परिचय उमलत्या उत्सुकतेनें तुम्हीं ऐकून घेतला त्याबद्दल आम्हीं तुम्हांला सुवासिक धन्यवाद देतों. आमचें आयुष्य अल्प असलें तरी सुजनांचा सत्कार करणें हाच आमचा पवित्र सेवाधर्म. तो आम्हीं सदैव सुफलित करूं; असें तुम्हांला मधुर आश्वासन देतों. आतां ज्या सुमनांनीं आपला परिचय करून दिला त्या सुमनांचा हार गुंफून तो भूमातेला घालण्याचा शेवटला कार्यक्रम होईल तेवढा प्रसाद घेऊन जावें.

## पुष्पांचा हार

एकत्र गुंफूया पुष्पांचा हार ।
पुष्पांचा हार ।
भूमातेला वाहूं रत्नांचा हार ॥ ध्रु०॥

गुलाब माणीकें हीं डौलदार ।
हीं डौलदार ।
मोहवी रंग ही मना अपार ॥ १ ॥

हिरा हा मोगरा दरवळला ।
दरवळला ।
उधळी सुगंध चहुंबाजूला ॥ २ ॥

पाचूचीं पर्णें हीं गुंफूं मधून ।
गुंफूं मधून ।
स्वर्गींच्या देवता हंसती बघून ॥ ३ ॥

बहरला अहा पारीजातक ।
पारीजातक ।
बरसले अंगणांत मौक्तिक ॥ ४ ॥

स्यमंतकापरी कमळ हें ।
कमळ हें ।
लक्षुमीचा वास तेथ आहे ॥ ५ ॥

—कृष्णाबाई सावकार.

# श्रावणमास

(भारतीय संस्कृतीचें मांगल्य व पावित्र्य घरोघर गायिल्या जाणाऱ्या विविध स्त्रीगीतांत सामावलेलें आहे. स्त्रीगीतांनींच त्याचा झरा अनंत कालापासून वर्तमानकाळापर्यंत अखंड वाहात ठेवला आहे. निसर्ग व मानव यांची श्रद्धाळू देवाण घेवाण स्त्रियांच्या फेरगीतांत डोकावत आहे.)

आला श्रावण मास ग । रानीं फुलांचा सुवास ।
श्रावणाच्या सरी येती । भरभर येती जाती ।
पारिजात सडा घाली । जाई जुई हसे गालीं ।
तेरड्याचे तीन रंग । गुलाबाचे धुंद रंग ।
सण येई नागोबाचा । फेर धरा पंचमीचा ।
दूधलाह्या नागोबाला । नेवूं चला वारूळाला ।
मंगळवारीं येई गौर । चला पूजूंया लौकर ।
फूलपत्री वाहूं तिला । आशीर्वाद मागूं भला ।
झिम्मा फुगडी खेळूं चला । संतोषवूं या देवीला ।
बुध बृहस्पती आला । योग्य मान त्यास दिला ।
शुक्रवारीं जिवतीबाई । हळदी कुंकवाची घाई ।
गूळ फुटाण्याची ओटी । गोड वृत्ती ठेवा पोटीं ।
नाग-नरसोबा आला । शुक्रवारीं पुजूं त्याला ।
प्रेम बहीण भावाचें । राखीबंधन सणाला ।
सागराला द्या श्रीफळ । थांबे लाटांची खळबळ ।
गोकुळींचा राणा आला । बांधा अष्टमीला झोला ।
दहींकाला दहीहंडी । गोपी गोपाळांच्या झुंडी ।
पिठोरीचा सण आला । श्रावणाच्या अंवसेला ।
घरोघरीं बैलपोळा । पुजूं गोमातेच्या बाळा ।
उत्साहाचा वाहे झरा । जाई श्रावण माघारा ।
एक मास येतो जातो । बारा महिने सुखवितो ।
असा महिमा श्रावणाचा । नित्य गावो अमुची वाचा ।

—सत्यवतीबाई राणे.

# संदेश

**दीपनृत्य**

( कोणाच्याहि निंदा स्तुतीची पर्वा न करतां निरपेक्ष सेवा करून जगाला सुखी करा असा दिव्य संदेश निसर्गानें आपल्याला दिला आहे. )

**कृति–१६** मुली घ्याव्या.

मातीचे लहान सुंदर कुंभ ( **घट** ) घेऊन त्यांस कडेनें भोकें पाडावीं. आंत वाळू घालून त्यावर मेणबत्ती तेवत ठेवावी. ते कुंभ हातांत घेऊन कृती करावी. हें नृत्य रात्रीं घ्यावें.

**( चाल–मन डोले )**

हीं शांत ज्योत । उजळे प्रशांत ।
करिते जग प्रकाश मान ।
करिते दूर दूर अंधार । आ आ ॥ध्रु०॥
नदी वाहते । कष्ट साहते ।
एकच हेतु धरोनी ।
जीवन देऊनी । जनां तोषवी
समाधान देखोनी । जनांचें ।
हें प्रमुदित हो मन ।
विकसित जीवन ।
रानिं वनीं ये बहार । करिते ॥ १ ॥
अमृत कुंभा घेऊनी येई ।
गगनीं चंद्र विलासे ।
थकल्या जीवा अमृत प्राशन ।

आनंदें जग नाचे । देखे ।
हा देतो निजधन ।
रिझवित जनमने ।
सेवा करी अपार । करिते ॥ २ ॥

निसर्ग देतो असे दाखले ।
निरपेक्ष करी सेवा ।
कुणि निंदो वा कुणि वंदो त्या ।
नसे स्तुतीची पर्वा । मुळीं त्या ।
त्या एकच माहित ।
निजतनु झिजवित ।
जग हो सुखी अपार । करिते ॥ ३ ॥

भारतवासी आपण सारे ।
पाळूं या संदेशा ।
समता, एकी, बंधुभाव गुण ।
उज्ज्वल करुं निजदेशा ।
हा स्वतंत्र भारत ।
कीर्ति अविरत ।
पसरो जगीं अपार । करिते ॥ ४ ॥

—अम्बू आगटे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# आमचे सण

( चाल–आओ बच्चों )

ऐका जनहो, कथा सांगते । आमुच्या हिंदु सणांची ।
चार मास हे भुरकन जाती । मेजवानि आनंदाची ।
सण हे अमुचे छान । सण हे अमुचे छान ॥ ध्रु० ॥
श्रावण महिना सुरू जाहला । 'नागपंचमी' सण पहिला ।
वारुळीं जाऊनी फेर धरूनी । आनंदें गाती महिला ।
नाराळि पौर्णिमा मग येई । 'राखि पौर्णिमा' नांव तिला ।
बंधू हातीं बांधुनि राखी । भगिनी विनवी भावाला ।
संकट कालीं धांव घेउनी । पाठ राख तूं भगिनींची ।
चार मास हे........हे छान ॥ १ ॥

कृष्णजयंति थाट उडाला । श्रावणमासीं अष्टमीला ।
कृष्णमंदिरीं मोदभरें जन । फोडिति हंडी दहिकाला ।
' गणपति उत्सव ' सर्व जनांच्या । ये भरती आनंदाला ।
बहुविध चालत कार्यक्रम हे । दावित निजकौशल्याला ।
' नवरात्राचा ' उत्सव संपुनि । ' दसरा ' लूट सुवर्णाची ।
चार मास हे......हे छान ॥ २ ॥

दिपवाळीचा सण मोदाचा । सान थोर हीं सर्व मनें ।
दिवे लावुनी झगमग झगमग । शोभा देती हीं सदनें ।
दणदण वाजति बार फटाके । प्रमुदित होती हीं सुमनें ।
किल्ले मांडुनि आरास करिती । द्विगुणित मोदें बालमनें ।
भाऊबिजेचा सण मोदाचा । धांदल होई भगिनींची ।
चार मास हे........हे छान ॥ ३ ॥

—अम्बू आगटे

# गांवगाडा

( भारताला स्वातंत्र्य मिळालें. आतां खेड्यांचा विकास करणें हें भारताचें प्रमुख कार्य. स्वतंत्र भारतांतील खेड्यांतल्या मुलामुलींना आपल्या खेड्याचा उद्धार करण्यासाठीं काय काय करायला हवें तें पहा. )

कृति—समसमान मुलें व मुली घेऊन प्रसंगानुरूप बसवावी.

सौतंत्र देशांतल्या खेडूत मुली आम्हीं कसून
करूं चला काम ग ॥ है ॥
सौतंत्र देशांतलीं खेडूत मुलं आम्हीं कसून
करूं चला काम र ॥ है ॥ ध्रु०॥

खपूंया शेतांत रात्रंदिनीं ।
घाळूनि घामाचं त्यांत पाणी ।
पिकवूं या दानं मोत्यावानी
देशाच्या शेतींत नंबर अपुला ।
जगाच्या शेतींत नंबर आपुला ।
येईल पहिला होय कीं । होय बाबा ॥ १ ॥

गोशाळा भरपूर काढूं चला ।
खिल्लाऱ्या बैलांची जोडी त्याला ।
देशाची संपत्ती वाढायाला ।
दुधातुपाला वाण मग कसली ।
चहाच नग तो प्यायला । नग बाबा ॥ २ ॥

करडई पिकवूं शेतामंदी ।
तेलघाणा काढूं या गांवामंदी ।
पैशाची वाण नाई तेल्या कदी ।
डालडाचं तूप नाई खायच कदी ।
यंत्राचं तूप नाई खायाचं कदी आमी ।
गावांत पैका राहिल । आमुच्या ॥ ३ ॥

कपाशी पेरुंया शेतामंदी ।
सूत आमी काढूं या घरामंदी ।
विणील खादी गावामंदी ।
परदेशी कपडा नग आमाला ।
स्वदेशी कपडा हवा आमाला ।
पैशाची बचत हाय की । हाय बाबा ॥ ४ ॥
सुतार आमचा कारागिर ।
बांधील गावांत नवीं घरं ।
त्यामंदी सुखाचा संसार कीं:रं ।
नको महाल आम्हां नको हवेली ।
नको गाडी-घोडा नको तबेला ।
माणुसकी त्याच्यांत नाय र । नाय कीं ॥ ५ ॥
कुंभार चांभार लोहार आदि ।
सारीं सारीं हैत आमच्या गावा मंदी ।
मालाचा खप मग सर्वां आदी ।
नाई भासायची अडचण कशाची ।
नाई लागायची गरज शेजीची ।
गावांत गरजा भागतिल । आमच्या ॥ ६ ॥
गांवाची सफाई करूं बरी ।
रोगराई चट सारी जाइल दुरी ।
लायबरी वाचन रोज करी ।
गावकीचा गाडा वेशीवरी ।
घालवून देवूं अन् जगाला दिपवूं ।
खेड्याचा नमुना है कीं । म्हनतिल ॥ ७ ॥

—पार्वतीबाई ठोंबरे.

# निशिनाथाच्या राज्यांत

पृथ्वीवरील चिमुकल्या सुरेख, गोंडस बालिकांचा फेर तुम्हीं आम्ही सर्वांनीं पाहिला आहे. खालील पद्यांतहि तसाच फेर, निशिनाथाच्या प्रशांत राज्यांत सौंदर्य सम्राज्ञी पऱ्यांनीं धरला आहे.

( चाल—नखांनखांवर )

चला पऱ्यांनो साऱ्या मिळुनी
बागेमध्यें खेळाया ग बागेमध्यें
खेळाया, जाऊं चला.............. ॥ध्रु०॥

रातराणी ही किणकिण करिते । शशि लागला डोकाया ।
अवनी सारी शांत झोपली । गुपित आपण राखूं या ।
हळू पाऊलें चला ग भरभर । चंदाला त्या आणूं या ।
आणूं या..........बागेमध्यें ॥ १॥

आकाशींच्या तारकांनो । काय चालली कुजबूज ? ॥
द्या धाडूनी सवें आमुच्या । आभाळींचा निशिराज ।
आलों गुपचुप खेळायला । घालुनिया हा नवसाज ।
नवसाज..............बागेमध्यें ॥ २ ॥

नाव हवी कां तुज पुष्पांची । सांग मनीषा सांग मला ।
हा बघ आला राजा अपुला । सवें घेऊनी रोहिणीला ।
राजा-राणी शोभे नौकेमध्यें । जलक्रीडेला जाऊं चला ।
वल्हवूं चला.........बागेमध्यें ॥ ३ ॥

फेर धरूंया आपण अपुला । मधेंच घेऊं चंदाला ।
हर्ष माइना हृदयीं म्हणुनी । जोडी धरा ग खेळाला ।
स्वर्गींचे सुरगण मग येतिल । खेळ अपुला पहायला ।
बघायला...................बागेमध्यें ॥ ४ ॥

पुष्पांचा हा करूनी झोला । या ग साऱ्या ताल धरा ।
थय थय नाचुनी तालावर्ती । जाऊं आपण पैलतिरा ।
पुरे करा ग पुरे सख्यांनो । खेळ आपुला बंद करा ।
बंद करा.........बागेमध्यें ॥ ५ ॥

—इन्दुमति छल्लारे.

# झांशीची राणी

( झांशीच्या राणी लक्ष्मीनें दत्तक वारस नामंजुरीचें इंग्रजाचें फर्मान ठोकरीनें उडवून दिलें. लढाईस तोंड लागलें. स्त्रीपलटणीची अग्रणी होऊन या वीरांगनेनें इंग्रजांना धूळ चारली. हा ज्वलंत प्रसंग छोट्या बालिकांकडून खालील अभिनय गीतांतून वठवितां येईल. )

भरभर चला बाई । पाऊल उचला, हो हो हो ॥ ध्रु० ॥

झांशीचा किल्ला राणीचा
डोळा त्यावर गोऱ्यांचा
संताप झाला राणीचा
म्हणून म्हणते हो, भरभर चला बाई ॥ १ ॥

लक्ष्मी राणी मर्दानी
पलटण अमुची घेऊनी
गोऱ्यांना लाविल पळवूनी
म्हणून म्हणते हो, भरभर चला बाई ॥ २ ॥

किल्ल्याला वेढा गोऱ्यांचा
वर्षाव करिती तोफांचा
दरारा मोठा राणीचा
म्हणून म्हणते हो, भरभर चला बाई ॥ ३ ॥

तोफेचा गोळा आला आंत
दुष्टांनीं केला मोठा घात
झांशी पडली संग्रामांत
म्हणून म्हणते हो, भरभर चला बाई ॥ ४ ॥

भीतीच नाहीं लक्ष्मीला
पाठीशीं घेतलें बाळाला
भेदून गोऱ्यांच्या सेनेला
उडून गेली हो
आमुची राणी हो
गोऱ्यांचा डाव कसा हाणून पाडलाय हो हो हो ॥ ५ ॥

—सत्यवतीबाई राणे.

# पृथ्वीचा नवसाज

( निसर्ग रमणीय दृश्यें हे पृथ्वीचे विविध अलंकार आहेत. कसें तें खालील कवितेंत पहा. )

कृति–कितीही मुली घ्याव्या. अर्थपूर्ण कृति करावी.

( चाल–सोनियाच्या ताटीं )

चांदण्या रातीं । तारा चमचमती ।
चंदादादा पाहिलास । आज । पृथ्वीचा हा नवसाज ॥ ध्रु० ॥
सागरीं लाटा । कुरळे केस ।
नदीचा भांग उजळे खास ।
तिलक भालीं । प्रभाकराचा । शोभवी हास्यमुखास । आज ।
पृथ्वीचा हा······॥ १ ॥
अंजिरी शालू शोभतो फार ।
फुलाफुलांचा तो बुट्टीदार ।
वरुण राजा बंधू तियेचा । आहेर केलाय खास ।
आज । पृथ्वीचा हा·········॥ २ ॥
हिरवळ शोभे दाही दिशाला ।
मखमली गालिचा हा अंथरला ।
बाळें खेळती । मोदें बागडती । आनंद होई मनास ।
आज । पृथ्वीचा हा······॥ ३ ॥
फळाफुलांचे नवविध दागिने ।
जवार बाजरी मोत्याचे दाणे ।
रत्नांची खाण सुखासी वाण । ना पडो आमुची आस
आज । पृथ्वीचा हा······॥ ४ ॥

—अम्बू आगटे.

# फुलांची कुजबूज

सुळुक, सुळुक, वाऱ्याची झुळुक ।
वाऱ्याची झुळुक वनांत खेळे ।
हिरव्या हिरव्या पानांत फुलवंती डोले ।
फुलांचा राजा, फार करी मजा ।
माना डोलवी सर्वांना बोलवी ।
फुलं झालीं गोळा, त्यांचा भरला मेळा ।
फुलं लागलीं बोलूं, मजलस लागली खुलूं ।
फुलं आलीं रंगांत । बोलुं लागलीं जोरांत ।
कान देऊन ऐका हं ।

( जाई, जुई, प्राजक्त, बकुली, चांफेकळी, निशिगंध )

निशिगंध—अग अग जाई । वेलीवर राही ।
नाजूक हात तिचे । नाजूक पाय ।
सुगंधाची बात सांगावी काय ।
जाई—माझं कसलं बाई, तो बघ प्राजक्त ।
झाला कीं आरक्त
नाजूकपणाची खाण । कणखरपणाची वाण ।
प्राजक्त—ही कोण ग ? रंगानं सांवळी । रूपानं बावळी
बकुळी—हं हं ! मी तर बकुळी.
माझ्या वासानें होती सारीं खुळीं ।
जाई—लाजरी बूजरी । खुदकन हांसरी ।
मांडवावर राही । अशी आमुची जुई ।
गेली कुठें बाई ?

**बकुळी**—ती पहा, ती पहा लपे पानांत हंसे गालांत ।
गाई मनांत । अगदींच लाजरी ।

**जाई**—हा कोण ग बाळी ? अंगांत सोनसळी ।

**चांफेकळी**—मी आहे चांफेकळी.
उंचावर राही । आकाशांत पाही ।
उंच उंच झाडावर । मैत्रिणींचा ताफा ।
माझेंच कीं नांव सोनचाफा ।

**बकुळी**—हा बघ निशी, जाड जरा अंग । आपल्यांतच दंग
छान छान गंध । वाऱ्यानं धुंद ।
पांढरा माझा रंग आणि जाड जरा अंग ।

**डेलिया व शेवंती**—सबको अपनाही धर्म-
( हा चरण म्हणत येतात )

**प्राजक्त**—आला पहा डेलिया । गाई राग जोगिया ।
नाना ढंग याचे, खूपच रंग ।
कशाला भुललास ? कुठें रे रमलास ?

**डेलिया**—सांगतों, सांगतों. चूक माझी कबूल करतों.
ती आहेना पोरटी. आपली शेवंती.
लागली भांडायला. वेळ लागला चालायला ।

**शेवंती**—वा कीं रे दादा. आपल्याला उशीर नी
माझें नांव. मी नाहीं जा बोलणार.
( फुरंगटून बसते. )

**डेलिया**—वेडी रे वेडी. किती ग तूं रडी.
तुला देतों खाऊ. आपण दूर जाऊं.
नको अशी रुसूं. कोपऱ्यांत अशी बसूं.

तें बघ. तें बघ. कोण आलं. कोण आलं.

आतां कां आलें हंसूं ?

( गुलाब येतो. )

**शेवंती**—या गुलाब राजा. काय तुझी मजा.

आकार डौलदार. पान नक्षीदार.

पण जपून हं. नाहींतर गुलाबराजा

देतो सजा. जाल याच्या वाटे तर

बोचील हा कांटे !

**गुलाब**—ही कोण ग ? ही कोण ग ?

सोन्याचा रंग, नागिणीचें अंग.

ही तर कोकणची राणी

उपमा देतो आपण केतकी वाणी

**चांफा**—खरंच काग राणी ? काय असतं कोकणांत ?

पाणी नारळांत ? मोती सागरांत ?

**केतकी**—सागराच्या कडेला. डोंगराच्या दरेला.

जन्मलें मी ।

अफाट सागर मोत्यांचें आगर

सृष्टी इथली आहे सुंदर

शोभा खाशी पोफळांच्या राशी

निसर्ग इथला बावनकशी ।

सुरूचा वारा देश मला प्यारा

नारळीच्या बागेंत आपण जाऊं

शहाळ्याचें पाणी पोटभर पिऊं

याल काग तुम्हीं ?

**सर्व**—हो ऽ हो. आम्हीं येवूं. आम्हीं येवूं.

( सर्व गाणें गाऊन नाचतात. )

( चाल—घरधनी बाजाराला जाल........ )

यारे या, या ग या, सख्यांनो
सर्व जणी या या ।
कोकणांत आज आपण जाऊंया चला ॥ ध्रु० ॥

उंच उंच गिरी आणि खोल खोल दरी ।
सृष्टीची शोभा ही इथेंच खरी
दरींत डोकावून पाहूंया चला । कोकणांत ॥ १ ॥

मोठेमोठे वृक्ष अन् छान छान वेली ।
घडाच्या भारानं लवल्या केळी ।
घडांतील केळीं आपण खाऊंया चला । कोकणांत ॥ २ ॥

रत्नांचा सागर मिठाचें आगर
पाण्याचा मोठा करतो वापर ।
कांठावरचे शिंपले आपण वेंचूया चला । कोकणांत ॥ ३ ॥

पावसाच्या सरी कोसळती वरी ।
मोडून जातात झाडें सारीं ।
झाडांचीं रोपें आपण लावूं या चला । कोकणांत ॥ ४ ॥

झाडांच्या रांगा नारळीच्या बागा ।
गोष्टी करिती उंच उंच सागा
नारळांतील पाणी आपण पिऊंया चला । कोकणांत ॥ ५ ॥

—सौ. सुनिता गांगल.

# वनमहोत्सव

( चाल—द्या आम्हां वरदान. राग—मिश्र पहाडी )

करूं वनमहोत्सवा साजरा ।
झाडें लावुनी, जीवन घालुनी
तळमळ चित्तीं धरा ॥ ध्रु० ॥
वरुणराज धरतीवर येइल ।
सुजलां सुफलां माता होइल ।
ना लागो आसरा । दुजांचा । ना लागो आसरा ॥ १ ॥

**निवेदन**—बरींच वर्षे झालीं त्या गोष्टीला. अवास्तव वाढलेलीं झाडें तोडलीं गेलीं व जमीन उजाड झाली. या अविचाराचा परिणाम आपणांस काय भोगावा लागणार याची कल्पना कोणालाच त्यावेळीं आली नाहीं. हसत केलेलें कर्म परिणामीं दुःखदायक ठरतें. उजाड झालेल्या जमिनीवर सुंदर टोलेजंग इमारती विराजमान झाल्या. घरमालकाच्या हातांत लक्ष्मी खुळखुळूं लागली. आनंदानें फुलून गेला तो..................पैसा भुकेच्या वेळीं चावायला उपयोगी पडत नाहीं, हें त्याला बऱ्याच उशिरां समजलें.

काय झालें पहा !

**( चाल—सुखकर झाला प्रातःकाल )**

वरुणराजा कोपून गेला । वृक्षराजींचा नाश कां केला ? ।
शिक्षा ही मानवाला । निश्चित घडली त्या समयाला ।
जलबिंदू संचय ना करी मेघ । जलधारा नर्तन कोठूनी मग ।
कृषिवल हताश होई । देवा, निष्ठुर कां रे होशी ! ।
चारा न मिळे । पाणी न मिळे । जनावरांचा जीव तळमळे ।
शेतांत धान्यहि नाहीं । देवा, निष्ठुर कां रे होई ? ॥

**निवेदन**—झाडें तोडल्यानें पाऊस दुरावला. उत्पादन कमी झालें, ' झाडें लावा ' ही नवी मोहीम सरकारनें सुरू केली.

' वनमहोत्सव ' या नव्या नांवानें त्यांनीं पुनर्जन्म घेतला. जुलई-ऑगस्ट या महिन्यांत या पाऊस कालांत ' वृक्षारोपण ' समारंभ प्रसिद्ध व्यक्तीच्या हस्तें थाटानें होऊं लागला. चोहोंबाजूंनीं कानावर हे सुस्वर पडूं लागले.

**( चाल–जय जय प्यारा हिंदुस्थान )**

या रे सारे, या रे सारे ।
एक दिलानें करुं या काम ।
' वृक्षारोपण ' करूं या आपण ।
पाहुं सुमंगल भारत छान ॥ ध्रु० ॥

रोपें लावुनि छोटीं मोठीं ।
सेवा करूं या देशासाठीं ।
वाढवुं त्यांना गाळुनी घाम
पाहूं सुमंगल भारत छान ॥ १ ॥

वर्षांमागुन वर्षें जातिल ।
फळाफुलांनीं वृक्ष डोलतिल ।
वर्षाकाळीं वर्षा पडतिल ।
देइ वरुण मग हें वरदान ।
पाहूं सुमंगल भारत छान ॥ २ ॥

**निवेदनः**—प्रथम प्रथम या बाळानें चांगलें बाळसें घेतलें. परंतु कालांतरानें त्याच्या जोपासनेकडे लोकांचें दुर्लक्ष झालें. पुष्कळशा झाडांनीं जागच्या जागींच माना टाकल्या. कांहीं जनावरांच्या मुखीं पडलीं ! अल्पायुषी ठरलीं !

ही गोष्ट लक्षांत आल्यावर झाडांची उत्तम निगा राखणाऱ्या प्रदेशास बक्षिसें मिळूं लागलीं. लोक चिकाटीनें, नेटानें जोपासना करूं लागले. रस्त्यावरील प्रवाशांना सांवली मिळूं लागली. विद्यार्थीहि श्रमदान करून या योजनेस हातभार लावूं लागले.

" एक झाड चुकून तोडलें तर दोन झाडें नवीन लावा " असा संदेश पं. नेहरूंनीं नुकताच दिला आणि म्हणूनच......

( राग–मिश्र पहाडी )

करूं वनमहोत्सवा साजरा ।
झाडें लावुनी, जीवन घालुनी
तळमळ चित्तीं धरा । जन हो । करूं ॥ ध्रु० ॥

वरुणराज धरतीवर येईल ।
सुजलां सुफलां भारत होईल ।
ना लागो आसरा । दुजांचा । करूं.........॥ १ ॥

—अम्बू आगटे,
—सौ. पार्वतीबाई ठोंबरे

# कमल-समर्पण

अंतःकरण प्रत्येकाजवळ आहे. प्रत्येक वस्तूची वास्तवता सर्वांना जाणवते. तिच्यापासून प्रत्येकाच्या भोंवतालच्या परिस्थितीप्रमाणें प्रत्येकाच्या अंतःकरणांत वेगवेगळ्या भावना निर्माण होतात. प्रशांत अंतःकरण मात्र एखाद्याच त्यागमूर्तींत असतें. कसें तें पहा.........

## ( प्रसंग १ ला )

पहाट झाली । पक्षीगण ते करिति कूजनाला ।
जागा होउनि चंदन माळी सोडी सदनाला ।
पाटी मोठी हातामध्यें घेऊनियां येई ।
सरोवराच्या कांठीं अवचित चाकित उभा राही ।
रत्नामध्यें कौस्तुभ जैसें विलसे त्या ठायीं ।
तारकांमध्यें चंद्रच दुसरा 'नीलकमल' पाही ।
हात पसरिला तोडुनि घेण्या बहुयत्नें खुडिलें ।
कोणी घेईल म्हणुनि त्याला हृदयाशीं धरिलें ।
सौंदर्याचें निधान माझें मीच धनी याला ।
'देईन न कुणा' बोले चंदन प्राण जरी गेला ।
सौंदर्याचें निधान माझें मीच धनी याला ।
देइन न कुणा.......प्राण जरी गेला ।

## ( प्रसंग २ रा )

प्राण पणाला लावुनी ज्यानें धनसंचय केला ।
धनिक असा कुणी पूजेसाठीं जात राउळाला ।
कमल अर्पितां प्रसन्न होईल देव अशा भावें ।
द्रव्य देउनि विकत घ्यावया धनिक त्वरित धावे ।

चंदन " नाहीं " म्हणे आर्पितां जरी द्रव्य रास ।
धनिक मनिं म्हणे, " आहे वेडा जगीं । एक खास "
सौंदर्याचें निधान माझें मीच धनी याला ।
' देइन न कुणा.........प्राण जरी गेला '

( प्रसंग ३ रा )

रूपैश्वर्यें सारित मागें शरद्सुंदरीला ।
रुमझुम टाकित पदलालित्यें येइ कुणि बाला ।
कमल पाहतें म्हणे " खरोखर मजला हें साजे ।
सहजालाहि सुंदर करितें रुप अतुल माझें ।
बोले मृदु मधु, हांसे खुदु खुदु, जवळ जवळ येई ।
चंदनमाळी भान विसरुनी कमल करी देई ।
भानावर ये चंदनमाळी म्हणे " सोड सोड ।
सर्वस्वाचें निधान माझें नाहिं जगीं तोड " ।
सौंदर्याचें निधान माझें मीच धनी याला ।
देइन न कुणा................प्राण जरी गेला ।

( प्रसंग ४ था )

कोण हा एथें बैसे निवांत।
दांभिक दिसतो वरून शांत ।
कल्पसुमापरी सारस वास ।
मोहीना कसा हा याचे मनास ।
आसक्ति सोडूनी समाधी रत ।
जीवनीं गुंफी हा तत्त्व उदात्त ।
म्हणूनी अर्पिलें कमल त्यानें ।
चरणीं बुद्धाच्या प्रशांत मनें ।

—सौ. शान्ताबाई काळे

# महाराणी लक्ष्मीबाई

## ( संगीतिका )

रे हिंद-बांधवा, थांब या स्थळीं, अश्रु दोन ढाळी ।
ही पराक्रमाची ज्योत मावळे, इथें झांशिवाली ।

( चाल-या चला सर्व बाला )

मनु—या चला सर्व बाला चला ।
खेळ खेळूं अतां चांगला ।
खेळ खेळूं अतां चांगला ।
मी राणी तुमची होईन ।
न्याय खरा तुम्हां देईन ।
आहे तक्रार कुणाची बोला ॥ १ ॥

मुलगी—सरकार आहे अमुची तक्रार ।
ही देते आम्हांला मार ।
कांहीं सजा करावी हिला ॥ २॥

मनू—बालिकांना कां गे मारिशी ? ।
सजा देते तुला मी अशी ।
उठाबशांची सजा हिला ॥ ३ ॥

( चाल-जिंदगी है )

मनू—हत्ती मला पाहिजे । बाबा, हत्ती पाहिजे ।
उं उं उं उं । हत्ती, मला पाहिजे ।
बाबा, हत्ती पाहिजे ॥ धृ० ॥

हत्ती आहे नानांना । तसाच रावसाहेबांना ।
मलाच कां न हत्ती तो । बाबा, हत्ती पाहिजे ।
मला हत्ती पाहिजे ॥ १ ॥

**बाबा**—बाळ हट्ट धरूं नको । गरिबांस कुठूनि तो ?
भाग्य लागतें तयास । दारिं हत्ती झुलत तो ! ॥ २ ॥

**मनू**—भाग्यहीन काय मी ?
हत्ती काय मज कमी ?
किती एक हत्ती ते झूलवीन मम गृहीं ।
झूलवीन ममगृहीं ॥ ३ ॥

**निवेदन**—थोड्याच दिवसांत झांशीचे राजे गंगाधरराव यांचेबरोबर मनूचा मंगल-विवाह मोठ्या थाटानें साजरा झाला. महाराणी लक्ष्मीबाई या नूतन नांवानें मनूनें झांशीच्या राजवाड्यांत पदार्पण केलें. बालपणीं धरलेला हत्तींचा हट्ट खरोखरीच पुरा झाला. तिच्या राजवाड्याच्या दारांत अनेक हत्ती झुलूं लागले.

**( चाल—नखांनखांवर )**

दिन सोन्याचा आज खरा ॥ धृ० ॥
भाग्यशाली ही राणी अमुची । गतवैभव हें येई घरा ।
महाराज गंगाधर राजे । शूर वीर सद्गुणी हिरा ॥ १ ॥
आनंदाच्या हिंदोल्यावर । वसंत उत्सव जणुं दुसरा ।
सुखि संसारा उणिव कशाची । प्रेमाचा वाहतो झरा ॥ २ ॥
चतुरंग ही सेना पदरीं । उणिव नसे मुळीं भांडारा ।
पिता पुत्र जणुं नातें दिसतें । प्रजा आणि या नरवीरा ॥ ३ ॥
गगनाच्या अंगणीं चमकतो । शशीकांत रोहिणी तारा ।
निज तेजानें सदैव विलसे । दीर्घायू दे प्रभूवरा ॥ ४ ॥

**निवेदन**—अशा तऱ्हेनें सुखी संसाराचीं कांहीं वर्षें गेलीं. झांशीचें वैभव चंद्रकलेप्रमाणें दिवसेंदिवस वृद्धिंगत होत गेलें. राजवाड्यांत बाल-युवराज़ांचें आगमन झालें. पुत्रजन्माचा मोठा सोहळा झाला. या गोष्टीला तीन महिने झाले. पण काळाला तें सुख पाहवलें नाहीं. आकस्मिक बाळराजांना त्यानें उचलून नेलें.

पुत्रशोकानें थोड्याच दिवसांत गंगाधररावहि त्याच्या मागें गेले. बिचाऱ्या लक्ष्मीबाई शोकसागरांत बुडून गेल्या. पण धैर्यानें त्यांनीं सर्व आघात सहन केले. दामोदर नांवाचा नेवाळकर घराण्यांतील एक मुलगा दत्तक घेऊन त्यांनीं राज्यकारभार सुरू केला. पण इंग्रजांच्या जुलमी सत्तेनें तो दत्तक नामंजूर ठरवून झांशीला वेढा घातला. लक्ष्मीबाईंनीं लढाईची जोरांत तयारी केली.

**( चाल—बोला जयजयकार )**

राणी— बोला जयजयकार हो। गर्जा जयजयकार हो।
झांशीचा उद्धार होईल। नव भारतीं अवतार हो।
ऽऽऽध्या घ्या शपथा झांशीसाठीं। एकनिष्ठ मनीं राहूं या।

मुली— झांशीच्या स्वातंत्र्यासाठीं। प्राण पणाला लावूं या॥ १॥

राणी— परक्यांची जुलमी सत्ता। झुगारून ही देऊं या।
'मेरी झांशी मैं नहीं दूँगी'। तत्त्वनिष्ठ मनीं राहूं या॥२॥
( महाराणी लक्ष्मीबाईचा जयजयकार असो )

अशा तऱ्हेनें सैन्य सज्ज करून ती सैन्याला धीर देत देत किल्लया-वरून फिरत होती.

**सैनिक**—बाईसाहेब, शत्रूचा गोळा तलावावर पडला. तलाव फुटला.

**दुसरा सैनिक**—सरकार, फितुरांनीं तटाला खिंडार पाडलं.
शत्रूसैन्य किल्ल्यावर चढूं लागलं.

**म्हातारा सैनिक**—सरकार, प्रसंग बांका आहे. स्वतःच्या
संरक्षणासाठीं ताबडतोब कूच करण्याशिवाय
उपाय नाहीं. जलदी करा. सरकार जलदी करा.

**राणी**—( लढतां लढतां शत्रूची गोळी लागून पडते. )
' मेरी झांसी मैं नहीं दूँगी SS '

**निवेदन**—अखेर स्वातंत्र्यासाठीं धडपड करणारी ही वीरांगना शत्रूच्या गोळीला बळी पडली.
देशासाठीं बलिदान करणाऱ्या या वीरांगनेला आमचे शतशः प्रणाम ।

**कोरस**—रे हिंद-बांधवा, थांब या स्थळीं,
अश्रू दोन ढाळी ।
ही पराक्रमाची ज्योत मावळे ।
इथेंझांशी वाली ।

**सूचना**—' रे हिंद.........झांशिवाली ' ॥
हे चरण ' कविवर्य भास्करराव तांबे ' यांच्या कवितेंतून घेतले आहेत.

—अंबू आगटे,
—पार्वतीबाई ढोंबरे

# कस्तूरबा केंद्र

### ( मूक दृश्य )

लहान खेडें अजाण भोळें । वसले जन त्यांत ।
कष्ट करूनि प्रतिएक त्यांतले । राहति सौख्यांत ।
या खेड्यांतुन हिंडत असतां स्थिरावले चरण ।
ऐकुनि भोळ्या जीवांचें हें भावपूर्ण भजन ॥ १ ॥

जमल्या होत्या लहान मोठ्या भगिनी त्या ठायीं ।
चटईवरती जवळी त्यांच्या होति शिक्षिका ही ।
असेल कां ही शाळा । अथवा असेल कां देऊळ ।
विचारांत या तिथें टाकिलें उत्सुक मी पाऊल ॥ २ ॥

पाहुनि मजला उठल्या सगळ्या करुनि वंदनाला ।
त्यांतुनि पुढती, शिक्षिकाच ती विनयें ये बाला ।
आगमनानें माझ्या दावुनि मनीं समाधान ।
कथिलें सारें कार्याचें यश घडलें तिजकडून ॥ ३ ॥

सायंकाळीं रोज जमति या बाया शिकण्याला ।
कुणा आवडे लेखन-वाचन कुणास शिवणकला ।
कधीं सांगतें आरोग्यास्तव महति सफाईची ।
प्रात्यक्षिक ही फिरुनी घरोघर सोबत ही यांची ॥ ४ ॥

गोष्टी सांगुनि, कधीं वाचुनी रमतें मन यांचें ।
परी आवडे भजनचि यांना अधीक देवाचें ।
या भगिनींच्या कितीक सांगूं गोष्टी तुम्हांला ।
झगडा देती दुर्दैवाशीं जीवन जगण्याला ॥ ५ ॥

( चाल–दिंडी )

यमूना ही दुर्दैवि एक बाई ।
चार बाळांची प्रेममया आई ।
कष्ट करिते दिनरात मुलांसाठीं ।
शिक्षणाची ही आस तिला मोठी ॥१॥
कोंबडा तिज सांगतो यमे ऊठ ।
श्रमीकांचा हा खचित गमे भाट ।
झणीं उठुनी ती बसे दळायला ।
दळण आणियलें मोल मिळायला ॥ २ ॥
शक्ति देते तिज लेकरांचि माया ।
आणि झिजवितसे श्रमुनि सुखें काया ।
तसे सुचति तिज शब्द ओवियांचे ।
विसरते ती मग दुःख जीवनाचें ॥ ३ ॥
भिवा माझा होईल जईं मोठा ।
गुराढोरांनीं भरविल तो गोठा ।
नांगरिल तो आपुली झटुन भूमी ।
वाट पाहिन मी वृद्ध दारिं बसुनी ॥ ४ ॥
ज़नो माझी सासरीं मग असेल ।
जगू माहेरीं तिला बोलवील ।
नातवंडें मी सर्व खेळवीन ।
नव्या संसारीं सुखें मी रमेन ”

(चाल) भीमा उठुनी रडूं लागते तों जाते आई ।
मांडीवरती निजवुनि तिजला दळि यमुनाबाई ।
सकाळ झाली गोठ्यामधुनी हंबरतात गुरें ।
चरवी भरुनी भिवा निघाला घरोघरीं सत्वरें ॥ १ ॥

आठ वाजतां जमती दारीं शिकावया पोरें ।
पाटी पुस्तक देते ज्ञानहि गोष्टींच्या द्वारें ।
जनी जगू येतात शिकाया हुशार तीं भारी ।
फळास येइल यमुनेची मग पुण्याई सारी ॥ २ ॥

असें चाललें केंद्र आमुचें स्मृति कस्तुरबांची ।
जागृत राहो सुखवुनि गरिबां इच्छा ही अमुची ।
मंत्रमुग्ध मी सारें ऐकुनि हळुच म्हणे बाई ।
तुमच्या कार्याची ही आहे सारी पुण्याई ॥ ३ ॥

—कृष्णाबाई सावकार

# कापूस

किती किती छान । किती किती छान ।
माझा कापुस गोरा पान ॥ धृ० ॥

टिचकी मारुन कचरा झाडूं ।
किडकीं पिवळीं बोंडें काढूं ।
माती झटकूं छान । माझा कापुस……… ॥ १ ॥

कापसातुन काढुनि सरकी ।
ताईला चल मदत करुं कीं ।
पिंजण करुं दे छान । माझा कापुस………॥ २ ॥

तांत ओढुनि पिंजण करिती ।
पेळुपाटावर पेळू । बनविती ।
काढिती सूत महान् । माझा कापुस ॥ ३ ॥

मागावरती विणती कापड ।
झगा शिवाया माझी धडपड ।
नवा झगा मग छान । माझा कापुस…………॥ ४ ॥

खादीचा हा घालिन फाक ।
गंध पावडर लाविन झक्क ।
त्याचा मज अभिमान । माझा कापुस……॥ ५ ॥

—सौ. फुलवन्ता झोडगे.

# माळीण

## ( संवादात्मक अभिनय गीत )

( चाल—जिया बे करार है । )

**माळिण**—कांदे वांगीं घोसाळीं ।
मेथी काकडी कोवळी ।
पडवळ कारलें दोडका ।
चाकवत आणि करडई ।
घ्या ऽ ऽ ऽ ऽ आळू घ्या हो, घोळू घ्या हो ।
साऱ्या घ्या हो भाज्या । साऱ्या घ्या हो भाज्या ।
छान बटाटे । लाल टमाटे
साऱ्या पहा भाज्या हो । गोड साऱ्या भाज्या ।

( चाल—हें गांव बी माझं )

**मारवाडीण**—ही आलु कशी । घोलु कशी । नगच मला ही ।
ही काकडि कशी । कारलं कशी । नगच मला ही ।

( चाल—गांवामंदी समद आमी )

**माळीण**—शेटाणीचं काम नाहीं भाजी घ्यायाचं ।
भाजी घेणं, भाजी खाणं काम काकीचं ।
चल जा नाहीं तुमचं ।

( चाल—केतकिच्या बनांत )

या हो या हो काकी । ही पहा दोडकी
पालेभाजी घ्या कीं । हो ताजी आहे काकी ।
**काकी**—अग ए, मी काय ताजी आहें ?
कांहींतरीच आपलं बोलायचं.

मोठ्यामोठ्या पानांची देग काढून आळू ।
ताजी भाजी आहे काग माळणि घोळूं. ।
कोशिंबिरीला काकडी छान कोंवळी ।
लवकर देग माळणी घरीं येईल गवळी ।

**( चाल—शेजारच्या घरांत )**

**भटजी**—कसली ग आहे भाजी । भाजी तुझ्याजवळी ।
हवी गोड गोड ताजी । मला घ्यावयाची भाजी ।

**( चाल—नाच रे मोरा )**

**माळीण**—छान ही भाजी । माझ्या मळ्यांतली ।
छान ही भाजी छान ।
सकाळीं नारद येवोनी ।
गेला हो भाजी घेऊनी ।
विष्णुस हवी होती ।
देवास हवी होती ।
आहेच तशी ही छान । छान ही भाजी माझ्या······

**( चाल—ऐन दुपारीं )**

आयुष्य वाढेल भाजी खाऊनी बोलती सूरवर ।
मग भाजी घ्या खाऊनी, जेवा तुम्हीं हो पोटभर ।
नाहीं लबाडी झुंबड पडते माझ्या पाटीवर ।
आतांच घरीं न्या हो, माझी भाजी ।
अहो माझी भाजी ।
धनीण तुमच्यावर होईल राजी ।
अहो होईल राजी ।

( चाल—नाच रे मोरा )

खा ही भाजी माळणीच्या मळ्यांतली ।
खा ही भाजी खा ।
भाजी चांगली निवडोनी ।
स्वच्छ पाण्यानें धूवोनी ।
नव्या नव्या लसणीची । फोडणी मोहरीची ।
येईल छान रुची । खा ही भाजी माळणीच्या
मळ्यांतली ।
खा ही भाजी खा ॥

—सौ. फुलवन्ता झोडगे

# स्वातंत्र्यदिन १९५८

(चाल-जारी जारी)

मराठी ग्रंथ संग्रहालय

आज स्वातंत्र्य-दिन हा आला ।
साऱ्या भारतीं आनंद भरला ।
साऱ्या भारतीं आनंद भरला ॥ धृ० ॥

रम्य सकाळ ही भाग्यवान् ।
जाई हरपून तनमन भान ।
निळ्या आकाशांत ! उंच उंच जात ।
झेंडा डौलांत हा फडफडला । आज ॥ १ ॥

सांगे बलिदान रंग केशरी ।
मध्यें प्रसन्न जाई पांढरी ।
हिरवा रंग हांसत-चक्र बोले खुशींत
देई संदेश हा आपणांला । आज ॥ २ ॥

धान्य अधिक शेतांत पिकवूं ।
सूत कांतून खादी ही बनवूं ।
झाडें लावूं देशांत । पाऊस आणूं शेतांत ।
सुखी समृद्ध ठेवूं देशाला । आज ॥ ३ ॥

टिळक गांधीजी सुभाष थोर ।
तपश्चर्या किती त्यांची घोर ।
असे वीर किती । नाहीं त्यांची गणती ।
जपूं अक्षय त्यांच्या कीर्तिला । आज ॥ ४ ॥

—सत्यवतीबाई राणे

# प्रार्थनापद्य

### राग–भूप

देवी तुज करूं प्रणाम ।
आम्हिं शारदे सदैव ॥ धृ० ॥

शुभ्रवसन करिं वीणा ।
गुंग होति जन गाना ।
लीन मयुर तव चरणा ।
हास्यवदन गुण-विकास । देवी ॥ १ ॥

प्रार्थित अम्हि बालकळया ।
जीवनिं आनंद भरा ।
सकल कला गुण देवुनि ।
देई अभय तूं आम्हांस । देवी ॥ २ ॥

—अम्बू आगटे

# शारदास्तवन

### राग–शंकरा

नमन करूं शारदा-पदाला ।
भाव-भक्तिचीं वाहुनि सुमनें ।
करित प्रार्थना मंगल वेला ॥ धृ० ॥
मयुरवाहिनी तूं जगमाता ।
निसर्ग-प्रेमी ज्ञानदेवता ।
करुनि कृपा तूं तोषवि सकलां ॥ १ ॥

—अम्बू आगटे

अनुक्रमांक ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# नेहरू चाचा

बालदिन आला ।
जय नेहरू चाचा बोला ॥ धृ० ॥

हिरा खरा जो भारतभूचा ।
नेता अजि तो सर्व जगांचा ।
शांतिदूत जणुं परमेशाचा । जगीं अवतरला ॥ जय ॥

मोतीलालजी, स्वरूपराणी ।
धन्य जाहले जन्म देउनी ।
भारतभूच्या वाहुनि चरणीं । जवाहिरलाला ॥ जय ॥

विद्येसाठीं युरोपदेशीं ।
राजपुत्र अन् गुणवंतांशीं ।
ओळख केली सर्व जगाशीं । धुरंधर झाला ॥ जय ॥

कमलादेवी, मोतिलालजी ।
स्वदेश कार्यीं झाले राजी ।
कष्ट साहिले स्वयेंच काजीं । सत्याग्रह केला ॥ जय ॥

वित्त पिता आणि अन् प्रेमळ भार्या ।
भारतभूच्या लावुनि कार्या ।
त्यागमूर्ति तूं दिपविसी साऱ्यां । आम्हां बालकां ॥ जय ॥

पंचशील तत्त्वांची वाचा ।
वारस तूंच खरा आर्यांचा ।
विश्वबंधु अन् अमुचा चाचा ।
चिरायु बोला ॥ जय ॥

—कृष्णाबाई सावकार

# रवींद्रास वंदन

वंदन तुज असुचें रविंद्रा ।
भारतभूच्या कविसम्राटा ।
दे आम्हांस वरा, रविंद्रा ॥ धृ० ॥
सतेज काया भव्य मनोहर
तपोनिधे दे मोद निरंतर !
भारावुनि मन गुंगवि क्षणभर ।
तूं गुरु देव खरा, मुनिवरा ॥ वंदन ॥

निसर्गपूजा भावें केली ।
परमेशाशीं ओळख झाली ।
प्रेमें भाळुन कवनें लिहिलीं ।
गीतांजलिकारा, कविवरा ॥ वंदन ॥

तव काव्याचें गुंजन गूढ ।
भक्तिरसाची लावी ओढ ।
परक्यांनाही झालें गोड ।
त्यासम ना दुसरा निवारा ॥ वंदन ॥

बक्षिस मानाचें मिळवीलें ।
शांतिनिकेतन तूंच स्थापिलें ।
विश्वभारती नांव तिज दिलें ।
सरस्वतीकुमरा, चकोरा ॥ वंदन ॥

स्वतंत्र आपुली भारतमाता ।
भूषण बनवाया तिज जगता ।
तूंच आमुचा स्फूर्तीदाता ।
दे आम्हांस वरा । उदारा ॥ वंदन ॥

—कृष्णाबाई सावकार

# बालसुमनें

घेतोसि नित्य सेवा । देवा अहा फुलांची ।
घे बाल मानसींची । पूजा अम्हां मुलांची ॥ धृ० ॥

जरि अज्ञ बाल सान । गाऊं तुझेंच गान ।
तव भक्ति ह्याच ठेवा । देवा, करी प्रमाण ॥ १ ॥

पुष्पासवें फुलावें । वाऱ्यावरी झुलावें ।
मधु गंध अंतरींचा । पसरोनि रंजवावें ॥ २ ॥

उजळूनि ज्ञानज्योति । ओवाळूं तुज सभोंतीं ।
येईल काय देवा । अमुची तुला प्रचीती ॥ ३ ॥

हीं अज्ञ बाल-सुमनें । कार्यीं तुझ्या वहावीं ।
जनताजनार्दनाच्या । सत्कारणीं पडावीं ॥ ४ ॥

—कृष्णाबाई सावकार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ९९२३७
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
वि:
नों: दि:
REFBK-0011237
REFBK-0011237